Research Article

# मंगळवेढा तालुका अंतर्गत पुरातत्वीय साधनांचे जतन व संवर्धन

**जावेद तांबोळी**

प्राध्यापक, इतिहास विभाग , संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

***सारांश*** :

भारतीय संस्कृती जितकी प्राचीन आहे, तितकीच ती महान आहे. पूर्वी पासून चालत असलेल्या पंरपरा चालीरीती आजही तेवढयाच निष्ठेने जपल्या जातात. प्राचीन भारतीय इतिहास पासून आधुनिक कालखंडाच्या इतिहासापर्यंत कितीतरी घटना, भारतीय भूमीत झालेले बदल, वेगवेगळया सत्ताधिशांनी केलेले आक्रमण, विदेशी संस्कृतीनी आपल्या भारतीय संस्कृतीशी केलेली समरसता अशा असंख्य बाबी भारतीय भूमीने पाहिल्या आहेत. भारतीय इतिहास हा फक्त ठरावीक प्रदेशापुरता मर्यादित नसून संपूर्ण भारतभर पसरलेला आहे. खरेतर भारताचा इतिहास हा अमर्यादित आहे. ज्याप्रमाणे एखादा जिल्हा तिथल्या असणाऱ्या तालुक्याशिवाय, तालुका तिथल्या असणाऱ्या गावाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. तसेच इतिहास हा प्रत्येक गावांतील अनेक छोटया मोठया ऐतिहासिक माहिती पासून बनतो. यामध्ये घडून गेलेल्या घटनेपासून त्या ठिकाणी असलेल्या पुरातत्वीय अवशेषही महत्वाचे असतात.

***प्रस्तावना*** :

भारतीय इतिहासाचा अभ्यास करत असताना पुरातत्वीय साधने ही प्राथमिक स्त्रोत मानली जातात. पुरातत्वीय साधने म्हणजे कमीतकमी १०० ते १५० वर्षापूर्वीच्या कोणत्याही वस्तू घरे, वाडे, मानवाचे अवशेष, मंदिरे, शिल्पे, मूर्त्या इत्यादी असंख्य भौतिक साधने होय. सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा हा तालुका व मंगळवेढा शहर हे पुरातत्वीय दृष्टीकोनातून अतिशय महत्वाचे आहे. अध्यात्मिक संत परंपरा लाभलेले या शहरात आजही काही पुरातत्वीय साधने मिळतात. श्री संत दामाजी महाविदयालयातील इतिहास विभागाने पुरातत्वीय संग्रहालय या दृष्टीने महत्वाचे आहे. माजी इतिहास विभाग प्रमुख प्रा. सावंत सर व विदयमान इतिहास विभाग प्रमुख प्रा. अशोक माने सर यांच्या मार्गदर्शनाखाली Preseration & conservation Center of Mangalwedha Taluka हा विभाग कार्यरत आहे.

उद्दिष्टये :-

१) श्री संत दामाजी महाविदयालयातील पुरातत्वीय संग्रहालयाचे महत्व स्पष्ट करणे.

२) मंगळवेढा तालुका व शहर पुरातत्वीय साधनांचे जतन करण्यासाठी समाजामध्ये जाण निर्माण करणे.

३) ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मंगळवेढा तालुक्यातील स्थळांचे उत्खनन करण्याच्या दृष्टीकोनातून महत्व स्पष्ट करणे.

❖ **छा. चि. क्र. १) स्तंभाचा भाग :-**



सुंदर शिल्प हे स्तंभाचा मधला भाग असून याला स्तंभमध्ये असे म्हणतात. सर्वात खालचा भाग हा तळखडा असतो. त्यावरील भागास स्तंभ असे संबोधतात. त्याच्या स्तंभमध्य हा भाग असतो. सदरील शिल्पात सर्वात खाली चौकोनी भाग असून त्यावर गोलाकार भाग आहे. त्याच्यावर अष्टकोनी भाग आहे. अष्टकोनी भागावर आयातकार भागात भौमितीक नक्षीकाम केले आहे व त्यावर पानाफुलांचे नक्षीकाम आहे. त्यावरील भाग भग्न आहे परंतु हा भाग गोलाकार असावा त्यावर गोलाकार कणी आहे.

❖ **छा. चि. क्र. २) स्तंभागा भाग :-**

सदर शिल्प देखील स्तंभाचा भाग असून यामध्ये तळखडा चाकोनी त्यावर षटकोनी भाग व त्यावरील भाग दोन सुलटया बशा होत्या व त्यावर दोन गोलाकार कणी असून त्यावर साखळीचे नक्षीकाम आहे त्यानंतर गोलाकार स्तंभमध्य आहेत.

❖ **छा. चि. क्र. ३) स्तंभ :-**



हा देखील स्तंभाचा भाग असून चौकोनी भागावर अष्टकोनी भाग आहे. त्यानंतर गोलाकार भागाच्या वर बहुधा चारी बाजूस दोन दान किर्तीस्तंभ कोरले आहेत. त्यावर शंकरपाळी आकाराचे नक्षीकाम आहे.


❖ **छा. चि. क्र. ४) स्तंभ :-**



हा स्तंभाचा प्रकार असून बहुधा अर्धस्तंभाचा प्रकार आहे.

❖ **छा. चि. क्र. ५) जैन तिर्थकर :-**

सदर मुर्ती ही जैन तिर्थकरांची असून त्यांच्याखाली त्यांची शक्ती कोरली आहे. २४ तिर्थकारांपैकी ही मुर्ती मल्लिनाथांची आहे कारण स्तंभाच्या वर कळसासारखा भाग हा कुंभ आहे मल्लीनाथांचे लच्छंण हे कुंभ आहे तसेच शासनदेवी ही त्यांची शक्तीदेवता आहे.



❖ **छा. चि. क्र. ७) द्वारपाल :-**

सदर शिल्प हे वैष्णव द्वारपालचे असून ती निभंगावस्थेत आहे. त्याच्या हातातील आयुध गदा दिसतो तर दुसरा हात भग्न आहे. मुकूट व अलंकारावरुन हे वैष्णवद्वारपाल प्रतिमा आहे. याच्या बाजूला चामरधारी स्त्री व निधी कोरला आहे.



❖ **छा. चि. क्र. ९) वीरगळ :-** सदर शिल्प हे वीरगळ असून हे ५ किंवा ३ कप्प्यात कोरले असते परंतू या ठिकाणी फक्त दोनच कप्पे शिल्लक आहे सर्वात खालचा कप्पा विरगळाचे कारण दुसऱ्या कप्प्यात लढाईचा प्रसंग आहे. वीरगळ म्हणजे गावांचे रक्षण करताना शहिद झालेल्या त्या वीर पुरुषांच्या सन्मानार्थ वीरगळ असते.



❖ **छा. चि. क्र. ११) शैव प्रतिमा :-**

मुर्तीची झाली झाल्यामुळे आयुधे व आभुषणे दिसत नाहीत परंतू त्रिशुल आणि जटामुकूटावरुन हे शैव प्रतिमा आहे हे स्पष्ट होते.



❖ **छा. चि. क्र. १२) सिंह व्याल :-**

काल्पनिक प्राणी असतो. मेषव्याल, अश्वव्याल, नरव्याल, मुख एक प्राण्याचे व शरीर दुसरे प्राण्याचे असते. मंदिराचा वादय सजवि त्यासाठी उपयोग करतात.



❖ **छा. चि. क्र. १३) कर्णशिला :-**

स्तंभ शिर्पावरील शिल्प कर्ण शिळा असून त्यावर उलटे सर्प असल्यामुळे हे यादव मंदिराचे (स्तंभाचे) वैशिष्ठ आहे.



❖ **छा. चि. क्र. १६) आमलक :-**

शिखरावरील भाग असून याला आमलक म्हणता येईल, शिखराचा वरचा भाग सजावटीसाठी आमलक वापर करतात.



❖ **छा. चि. क्र. १७) द्वारपाल :-**

सदरचे शिल्प हे द्वारपाल चे असून त्याच्या बाजुला चामरधारी स्त्री व निधी कोरला आहे पुढचा भाग हा द्वारपालशी संबंधीत आहे, निधी हे धनाचे प्रतीक असते.



**निकर्ष :-**

मंगळवेढा शहर व तालुका पुरतत्वीय दृष्टीकोनातून महत्वाचा आहे. मंगळवेढा शहरातील पुरातत्वीय साधनांचे जतन होणे गरजेचे आहे. पर्यटनांसाठी शहरातील वास्तू, मंदिरे, संताची स्मारके, अधिक प्रभावीपणे विकसित होणे गरजेचे आहे. या साधनांचे जनत व संवर्धन व्यवस्थित केल्यास पर्यटकांची संख्या वाढू शकते कारण पंढरपूरला आलेले भाविक, शालेय सहली अधिक प्रमाणात या मंगळवेढयाला भेटी देऊन जातात. तसेच कर्नाटकाकडे जाणाऱ्या सहली या सुध्दा मंगळवेढा नगरीला भेट देतात. मंगळेढयातील संत दामाजी महोत्सव वेळेस सर्वच पुरातत्वीय साधनांचे प्रदर्शन होणे गरजेचे आहे. त्यामुळे मंगळवेढयातील इतिहास सर्वच वयातील जिज्ञासू व्यक्तींना समजू शकेल. सिध्दापूर व मुढवी येथे झालेल्या उत्खननामुळे मंगळवेढा भूमीचा सातवाहन साम्राज्या बरोबर संपर्क होता हे सिध्द झाले आहे. भविष्यातही श्री संत दामाजी महाविद्यालयातील इतिहास विभाग पुरातत्वीय साईट शोधून विदयापीठ आनुदान आयोगाकडून उत्खनन करु शकतो. तसेच महाविदयालय Preseration & conservation Center of Mangalwedha Taluka यांचे मोठे संग्रहालय विदयापीठ अनुदानाकडून मिळवू शकते. यासाठी मंगळवेढा शहर व तालुक्यातील पुरातत्वीय साधनांचे जतन होणे गरजेचे आहे.

**संदर्भ साधने :-**

१) नू.पू. जोशी - भारतीय मुर्तीशास्त्र, १९७०
२) सदाशिव देवकर - सोलापूर जिल्हयातील कला वैभव व सांस्कृतिक व पुरातत्वीय समिती, सोलापूर महोत्सव २०१०
३) मा.श्री. मोरे - प्राचीन भारतीय कला, कॉन्टीनेटल प्रकाशन पुणे -१९७४
४) Bhandarkar R.G.-Vaishnavism Saivism and religious systems, strassburg-1913.
५) Saraswati S.K., A surey of Indian Sculpture Calcutta - 1933

६) Zimmer H. Art of Indian Asia, New York - 1955



**जावेद तांबोळी**
प्राध्यापक, इतिहास विभाग , संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.